**प्रतिवादी १ ते ३ तर्फे सा.क्र. २ यांना शपथ देण्यात आली.**

**नाव – निलेशकुमार कांताभाई कणसागर, वय– ४७ वर्षे,**

**व्यवसाय – सिमेंटचे खांब बनविणे.**

**रा. करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर.**

**<u>प्रतिवादी १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.०२ यांची सरतपासणी प्रतिवादी १ ते ३ तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

माझे दुकानचे नाव श्री.लक्ष्मी सिमेंट आर्टिकल असे आहे. माझे सिमेंट खांब बनवून विकण्याचा व्यवसाय आहे. मी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी यांना ओळखतो. त्यांनी माझेकडुन माल नेला होता. त्यांनी माझेकडुन सिमेंट पोल नेले होते. त्यांच्या मागणी नुसार मी त्यांना सिमेंट पोल दिले. त्यांनी मला पैसे दिले होते. मी तेंव्हा त्यांना पावती दिली होती. आता मला अभिलेखावर आर्टिकल क व ड असणारी पावती दाखविली. ती पावती मीच दिली होती. त्यातील हस्ताक्षर माझेच आहे. त्यावरील स्वाक्षरी माझीच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यातील नमुद रक्कम मला मिळालेली आहे. त्यास अनुक्रमे **निशाण क्र. १००, १०१** देण्यात येत आहे.

**<u>प्रतिवादी १ ते ३ यांचे तर्फे साक्षीदार क्र.०२ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. आर.व्ही.दिवाण यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

माझे कडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियमानुसार परवाना आहे. मी माघील ८ ते ९ वर्षापासुन व्यवसाय करतो. मी माझे दुकानातून जो माल विकतो त्या रकमेचा विक्री कर भरणा करत नाही. हे मला माहिती नाही की, प्रत्येक विक्रत्याला त्या वस्तुचा कर भरावाच लागतो किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही देयक पुस्तीका सांभाळत असतो. ग्राहकाने खरेदी केलेनंतर त्यास देयकाची पावती दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस देयक पुस्तकातील मुळ पावती खरेदीदारास दिली जाते व त्याची कार्बन प्रत आमचेकडे पुस्तीकेमध्ये राहत असते. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी न्यायालयात देयक पुस्तीका आणलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाण क्र. १०० व १०१ वरील देयके हे देयक पुस्तीकेतील नसुन कागदावर लिहून दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी व माझी जुनीच ओळख आहे. हे म्हणणे खरे

आहे की, मी प्रतिवादीच्या म्हणणे नुसार पावती बनवून दिली आहे.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दि.१३–०३–२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा